भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा सुधारीत कार्यक्रम

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

**निवडणूक प्राथम्य**

क्रमांक:-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.०२/का.७
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०९ नोव्हेंबर,२०२१.

प्रति,
जिल्हाधिकारी,
भंडारा, गोंदिया

विषय:- भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा सुधारीत कार्यक्रम.

संदर्भ :- १) राज्य निवडणूक आयोगाची समक्रमांकाची दि. ०३/११/२०२० व दि.०८/११/२०२१ ची पत्रे.
२) राज्य निवडणूक आयोगाचे समक्रमांकाचे दि. ०२/०२/२०२१ चे पत्र.
३) राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक- रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र.१/का-८, दिनांक ०९/११/२०२१ रोजीची अधिसूचना.

महोदय/महोदया,

राज्य निवडणूक आयोगाचे संदर्भाधीन अनुक्रमांक १ येथील दि. ०३/११/२०२० च्या पत्रान्वये भंडारा जिल्हा परिषद व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी देण्यात आलेल्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रमानुसार दि.०२/१२/२०२० रोजी अंतिम प्रभाग रचना व आरक्षण सोडतीची अधिसूचना प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच आयोगाचे दि. ०२/०२/२०२१ रोजीच्या पत्राद्वारे देण्यात आलेल्या मतदार यादी तयार करण्याच्या कार्यक्रमानुसार दि.१०/०३/२०२१ रोजी मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली. तथापि, राज्य शासनाचे दि.०४/०६/२०२१ व ११/०८/२०२१ रोजीचे ब्रेक द चेन मधील निवडणूकविषयक निर्बंधामुळे प्रत्यक्ष निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली नाही.

२. दरम्यानच्या काळात मा. सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल रिट याचिका क्र.९८०/२०१९ व इतर संलग्न याचिकांमध्ये दि.०४/०३/२०२१ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयातील रिट पिटीशन (सिव्हील)

क्र. ३५६/१९९४ श्री. डॉ. के कृष्णमूर्ती विरुध्द केंद्र शासन मध्ये दि. ११ मे, २०१० रोजी दिलेल्या निवाडयानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ५० % च्या मर्यादेत आरक्षण देण्याचे निदेश दिले आणि जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मधील कलम १२ (२) (क) मधील तरतूद त्यानुसार बदलली (read down केली.)

३. तथापि, राज्य शासनाने दि.२३ सप्टेंबर, २०२१ रोजी महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ सन २०२१ प्रख्यापित केला असून सदरच्या अध्यादेशानुसार भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्या अंतर्गत अनुक्रमे १ व ४ पंचायत समित्यांमधील नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व महिला (नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व सर्वसाधारण प्रवर्गातील) आरक्षण सोडत काढण्याकरिता आयोगाचे दि.०८/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये सुधारीत कार्यक्रम देण्यात आला आहे.

४. आयोगाचे दि.०२/०२/२०२१ रोजीच्या पत्रान्वये भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा कार्यक्रम देण्यात आला होता. सदर मतदार यादी ही दि. १५/०१/२०२१ या अर्हता दिनांकावर आधारित असून आता दि.०१/०१/२०२१ ते दि.३१/१०/२०२१ या कालावधीत नव्याने समाविष्ट झालेल्या मतदारांना मतदानाची तसेच निवडणूक लढविण्याची संधी देणे क्रमप्राप्त आहे. त्यामुळे आयोगाचे उक्त दि.०२/०२/२०२१ च्या पत्रान्वये माहे फेब्रुवारी-मार्च,२०२१ मध्ये राबविलेला मतदार यादी कार्यक्रम रद्द करण्यात येत असून पुन्हा नव्याने मतदार यादीचा कार्यक्रम देण्यात येत आहे.

## आदेश

५. मतदार यादीच्या कार्यक्रमाची व्याप्ती - राज्य निवडणूक आयोगाने दि.०९/११/२०२१ च्या अधिसूचनेन्वये दि.०१/११/२०२१ ही Cut- off date जाहीर केली असून, त्या दिवशी (म्हणजेच दि ०१ नोव्हेंबर, २०२१ रोजी) अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी वापरण्यात येईल.

वरील मतदार यादी ग्राहय धरुन भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांमधील अनुक्रमे परिशिष्ट २ मध्ये नमूद सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचा कार्यक्रम परिशिष्ट १ प्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| (i) | प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादी प्रसिध्द करणे | : दिनांक १२/११/२०२१ |
| (ii) | प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना दाखल करण्याचा कालावधी | : दिनांक १२/११/२०२१ ते दिनांक १७/११/२०२१ पर्यंत |

(iii) प्रभागनिहाय मतदार याद्या अंतिम व अधिप्रमाणित करुन प्रसिध्द करणे : दिनांक २४/११/२०२१

(iv) मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे : दिनांक २६/११/२०२१

**६. प्रभाग निहाय प्रारुप मतदार यादी तयार करणे :-**

६.१ सध्या विधानसभेच्या मतदार यादीचा डेटा राज्य निवडणूक आयोगास प्राप्त न झाल्यामुळे महाऑनलाईनतर्फे तयार केलेल्या आज्ञावलीच्या मदतीने मतदार यादीचे विभाजन होऊ शकत नाही. त्यामुळे सदर सार्वत्रिक निवडणुकांसाठी मतदार यादीचे पारंपारिक पध्दतीने विभाजन करावे.

६.२ प्रभागनिहाय मतदार यादी तयार करताना पुढील बाबींची खात्री करुन घ्यावी :-

अ) दि. ०१/११/२०२१ रोजी अस्तित्वात असलेली महाराष्ट्र विधानसभा मतदार यादीनुसार जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गण क्षेत्रातील समाविष्ट होणारे मतदार संघनिहाय एकूण यादी भाग विचारात घेण्यात आले आहेत, याबाबत खात्री करावी; जेणेकरुन संबंधित निवडणूक विभाग व निर्वाचक गणनिहाय क्षेत्राच्या विधानसभा मतदार यादीत मतदारांची नावे समाविष्ट करण्याचे राहु नये.

ब) जिल्हा परिषद निवडणूक विभाग व पंचायत समिती निर्वाचक गण क्षेत्रात समाविष्ट असलेल्या एकूण मतदारांची संख्या आणि निवडणूक विभाग व निर्वाचक गणासाठी तयार करण्यात आलेल्या प्रभागनिहाय प्रारुप मतदार यादीतील मतदारांची एकूण संख्या समान आहे, याची खातरजमा करण्यात यावी.

क) या मतदार यादीतील दुबार नावांबाबत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२००७/प्र.क्र.०६/ का.०५, दिनांक २४/०४/२००७ अन्वये कार्यवाही करावी.

ड) मयत अथवा स्थलांतरीत मतदारांच्या बाबतीत आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०१०/ प्र.क्र.४/का.५, दिनांक ११/१०/२०१० अन्वये कार्यवाही करावी.

इ) विधानसभेसाठी तयार करण्यात आलेल्या मतदार यादीमध्ये बदल करण्याचे जसे की, नवीन नावांचा समावेश करणे, नाव वगळणे, नावातील दुरुस्ती व पत्यांमधील दुरुस्ती करणे इत्यादींबाबतची कार्यवाही राज्य निवडणूक आयोगाकडून केली जात नाही. (आयोगाचे क्र.रानिआ-२०१५/प्र.क्र.३/प्रकल्प कक्ष, दिनांक १७/०४/२०१५ चे आदेश)

**७. प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे :-**

प्रारुप प्रभागनिहाय मतदार यादीवर मतदार / नागरिकांकडून हरकती व सूचना मागविण्यासाठी, प्रारुप मतदार यादीला दिनांक १२/११/२०२१ रोजी व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी. (परिच्छेद १० प्रमाणे)

**८. प्राप्त झालेल्या हरकती व सूचना विचारात घेऊन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करणे :-**

८.१ दिनांक १२/११/२०२१ ते दिनांक १७/११/२०२१ पर्यंत प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर नियमाप्रमाणे विचार करुन प्रभागनिहाय मतदार यादी अंतिम करण्यात यावी. प्राप्त होणाऱ्या हरकती व सूचनांनुसार फक्त खालीलप्रमाणे सुधारणा / दुरुस्ती करता येईल :-

(i) लेखनिकांच्या काही चुका

(ii) दुसऱ्या प्रभागातील मतदार चुकून अंतर्भूत झालेले

(iii) संबंधित प्रभागातील विधानसभा यादीत मतदारांची नावे असूनही, पंचायत समितींच्या संबंधित प्रभागाच्या मतदार यादीमध्ये नावे वगळण्यात आली असल्यास अशा मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करणे.

८.२ विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या सर्व हरकती व सूचनांवर निर्णय घेऊन आवश्यक असल्यास योग्य त्या सुधारणा मतदार यादीत कराव्यात.

९. अंतिम मतदार याद्या अधिनियमातील तरतुदीनुसार अधिप्रमाणित करुन त्याबाबतची सूचना दिनांक २४/११/२०२१ रोजी मुद्दा क्र. १० मध्ये नमूद केलेल्या पध्दतीने प्रसिध्द करण्यात यावी.

१०. प्रारुप व अंतिम प्रभागनिहाय मतदार यादीस जिल्हाधिकारी यांनी खालीलप्रमाणे व्यापक प्रसिध्दी द्यावी जसे-

(अ) जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती तसेच ग्रामपंचायत कार्यालयातील सूचना फलक

(ब) स्थानिक वृत्तपत्र

(क) स्थानिक केबल टि.व्ही.

(ड) जिल्हाधिकारी / जिल्हा परिषद कार्यालयातील संकेत स्थळ, इत्यादी

**११. राज्यात उद्भवलेल्या कोविड-१९ च्या पार्श्वभुमीवर प्रत्येक केंद्रात ७०० ते ८०० मतदार जोडण्यात यावेत.**

१२. वरील सूचनांप्रमाणे आयोगाने अधिसूचित केलेल्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीचे विभाजन विहित मुदतीत व बिनचूक करण्याची जबाबदारी संबंधित जिल्हाधिकारी व तहसिलदार यांची राहील.

१३. मतदार यादीचा कार्यक्रम सुरु झाल्यानंतर जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीबाबत न्यायालयाचे आदेश प्राप्त झाल्यास मतदार यादीचा कार्यक्रम रद्द करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकाऱ्यांनी आयोगास तात्काळ सादर करावा.

१४. मतदार यादीचा कार्यक्रम राबविताना प्रारुप मतदार यादीवर हरकती व सूचना मागविणे तसेच त्यावर प्राप्त झालेल्या हरकती व सूचनांवर सुनावणी घेण्याची प्रक्रिया कोवीड-१९ या साथीच्या

आजाराच्या अनुषंगाने घ्यावयाची खबरदारी म्हणून पुढील नमूद उपाययोजना अवलंबून पूर्ण करता येईल. जसे की-

१) सर्व हरकतदारांना एकत्र न बोलावता प्रत्येक हरकतदाराकरिता कमीतकमी १० मिनीटांच्या अंतराने स्वतंत्र वेळ देऊन बोलवणे.
२) सर्वांच्या बैठकीची व्यवस्था पुरेसे अंतर ठेवून करणे.
३) मास्क वापरणे अनिवार्य राहील.
४) सामाजिक अंतर ठेवणे आवश्यक आहे.
५) सॅनिटायझरचा वापर करणे.
६) आवश्यकतेनुसार थर्मल स्क्रिनिंग करणे.

१५. मतदार यादीचा कार्यक्रम आयोगाच्या https://mahasec.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

मा. राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

आपला,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

सोबत-परिशिष्ट-१ व २

प्रत :-

१. मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम इमारत, मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई-४०० ००१.
३. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४. विभागीय आयुक्त, नागपूर
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा व गोंदिया
६. महिती जनसंपर्क अधिकारी, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
७. संगणकीकरण कक्ष, राज्य निवडणूक आयोग यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने
९. निवड नस्ती (कार्यासन-७), राज्य निवडणूक आयोग

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.०२/का.७, दि.०९/११/२०२१

**परिशिष्ट-१**

## भंडारा व गोंदिया या २ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी मतदार यादी तयार करण्याचा सुधारीत कार्यक्रम

| अ.क्र. | निवडणुकीचा टप्पा | टप्पा सुरु करण्याची /पुर्ण करण्याची तारीख |
|---|---|---|
| १ | मतदार यादी ग्राहय धरण्याचा दिनांक | दि.०१/११/२०२१ |
| २ | राज्य निवडणूक आयोगाने अधिसूचित केलेल्या तारखेस अस्तित्वात असलेल्या विधानसभेच्या मतदार यादीवरुन जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता तयार केलेली मतदार यादी हरकती व सूचना मागविण्याकरिता प्रसिध्द करण्याचा दिनांक | दि.१२/११/२०२१ |
| ३ | मतदार यादीसंदर्भात हरकती व सूचना दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. १७/११/२०२१ |
| ४ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणाच्या छापील मतदार याद्या अधिनियमाच्या कलम १३ खाली अधिप्रमाणित करण्याची तारीख | दि. २४/११/२०२१ |
| ५ | निवडणूक विभाग व निर्वाचक गणांच्या छापील मतदार याद्या माहितीसाठी ठेवण्यात आल्या आहेत, याबाबतची सूचना प्रसिध्द करण्याची तारीख | दि.२४/११/२०२१ |
| ६ | मतदान केंद्रांची यादी व मतदान केंद्रनिहाय मतदार यादी प्रसिध्द करणे | दि. २६/११/२०२१ |

राज्य निवडणूक आयुक्त यांचे आदेशानुसार,

( किरण कुरुंदकर )
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

D:\Tendulkar\सुप्रिया\सन २०२१\भंडारा व गोंदिया\मतदार यादीचा कार्यक्रम-२०२०.docx

राज्य निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक-रानिआ/जिपपंस-२०२१/प्र.क्र.०२/का.७, दि.०९/११/२०२१

## परिशिष्ट-२

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नांव | पंचायत समितीचे नाव |
|---|---|---|
| १ | भंडारा | १) तुमसर |
| | | २) मोहाडी |
| | | ३) भंडारा |
| | | ४) साकोली |
| | | ५) लाखनी |
| | | ६) पवनी |
| | | ७) लाखांदूर |
| २ | गोंदिया | १) गोंदिया |
| | | २) तिरोडा |
| | | ३) गोरेगाव |
| | | ४) आमगाव |
| | | ५) सालेकसा |
| | | ६) सडकअर्जुनी |
| | | ७) अर्जुनी मोरगाव |
| | | ८) देवरी |

निवडणूक प्राथम्य

**माहे डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हापरिषदा व पंचायत समित्या व ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/पोटनिवडणुकांसाठी दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२१ रोजी अस्तित्वात असलेली विधानसभेची मतदार यादी ग्राह्य धरण्याबाबत**

# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्रमांक: रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. १/का-८
नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालयासमोर,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक :- ०९/११/२०२१

## आदेश

मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ (१८८८ चा मुंबई ३) च्या कलम१९(१) (ब), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९)मधील कलम ७ (अ), महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा.४०) च्या कलम ११, महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा.५) च्या कलम १३ तसेच महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (१९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३) चे कलम १२ चे पोट-कलम(१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, <u>दिनांक ०१ नोव्हेंबर,२०२१ या दिवशी अस्तित्वात</u> असलेली महाराष्ट्र विधानसभेची मतदार यादी, माहे डिसेंबर २०२१ ते जानेवारी २०२२ या कालावधीत होणाऱ्या महानगरपालिका, नगरपरिषदा/नगरपंचायती, जिल्हा परिषदा व पंचायत समित्या तसेच ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक/ पोट निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्यासाठी वापरण्यात येतील असे अधिसूचित करण्यात येत आहे.

मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार

(किरण कुरुंदकर)
सचिव
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र